**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP)**
**विभागीय कृषी सहसंचालकांची कार्यसूची निश्चित करणेबाबत......**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय क्र.एपाव्य २०१२/प्र.क्र.१५/जल-८**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १३ मार्च, २०१२**

**<u>वाचा</u> :**

१. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.सामासू १००८/प्र.क्र.४१/जल-२०, दिनांक २१ मे, २००८.
२. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.सामासू २००९/प्र.क्र.७/जल-८, दिनांक ३१ डिसेंबर, २०११.

**<u>शासन निर्णय</u> :**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पर्जन्यधारीत क्षेत्रे प्राधिकरणाने पाणलोट विकास कार्यक्रमाकरीता सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ निर्गमित केल्या आहेत. सदर सूचना दिनांक १ एप्रिल, २००८ पासून लागू करण्यात आल्या आहेत. या सामाईक मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या सर्व पाणलोट विकास कार्यक्रमांना लागू आहेत. या सूचनांना अनुसरून केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) ही योजना सन २००९-१० पासून सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यास सन २००९-१० मध्ये ९.९६ लाख हेक्टर, सन २०१०-११ मध्ये १६.१४ लाख हेक्टर व सन २०११-१२ मध्ये ०९.३१ लाख हेक्टरच्या प्रकल्पांना मंजूरी मिळाली आहे. या तिन्ही प्रकल्पांची एकूण किमंत रू. ४४७३.०३ कोटी इतकी आहे. पुढील २ वर्षातही राज्यास या योजनेंतर्गत नवीन प्रकल्प मंजूर होणार आहेत. हे प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण होणे आवश्यक असल्याने ते पूर्ण करण्यासाठी सर्व स्तरावरून यथोचित प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**२.** एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर प्रधान सचिव (जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली वसुंधरा राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची स्थापन करण्यात आली आहे. या यंत्रणेवर आयुक्त (कृषी) हे सदस्य असून संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट विकास कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) [पूर्वीचे जिल्हा पाणलोट विकास युनिट (DWDU)] स्थापन करण्यात आले असून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी त्याचे सदस्य सचिव आहेत.

**३.** एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर कृषी विभागातील अधिकाऱ्यांची कार्यसूची निश्चित करण्यात आली असली तरी त्यामध्ये विभागीय कृषी सहसंचालकांना स्थान देण्यात आले नसल्याने या योजनेतील त्यांच्या जबाबदारीबाबत संभ्रम निर्माण होत आहे. विभागीय कृषी सहसंचालक हे विभागीय प्रमुख असल्याने पाणलोट विकासाच्या ह्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये त्यांच्यावर निश्चित करण्यात आलेली जबाबदारी आता या शासन निर्णयासोबतच्या ' **प्रपत्र - १** ' मध्ये नमूद करण्यात आल्या प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**४.** विभागीय कृषी सहसंचालकांनी या जबाबदाऱ्यांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक असून त्यांनी याबाबत केलेली काम त्यांच्या गोपनीय अहवालात प्रतिबिंबीत होणार आहेत.

**५.** हा शासन निर्णय कृषी विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१२०३१३०९२२००३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मंत्री जलसंधारण, यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री जलसंधारण यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव (जलसंधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव (जलसंधारण), तथा अध्यक्ष वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा , मंत्रालय, मुंबई - ३२
मा. मुख्य सचिव यांचे सचिव
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रमुख मार्गदर्शक, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, राळेगण सिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर.
कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, शिवाजीनगर, पुणे.
उपसचिव (आस्था), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
प्रधान मुख्य वनसरंक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रधान मुख्य वन सरंक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे सर्व सदस्य,
विभागीय कृषी सहसंचालक, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातूर,
सर्व जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (जल-८)

**शासन निर्णय क्र.एपाव्य २०१२/प्र.क्र.१५/जल-८ दिनांक १३ मार्च, २०१२ चे प्रपत्र " अ "**

**सहसंचालक (कृषी) यांची IWMP कार्यक्रमामधील कार्यसूची :**

सहसंचालक (कृषी) यांची या कार्यक्रमातील जबाबदारी ही प्रगतीचा वेळावेळी आढावा घेणे, देखरेख ठेवणे तसेच चाचणी तपासणी (Test Check) ची राहील.

**अ) सविस्तर प्रकल्प अहवाल : DPR**

१) DPR साठी लागणारे पाणलोटांचे व गावांचे GIS Map उपलब्ध करून देणे (मुख्य भूमिका),
२) WDT मार्फत जास्तीत जास्त DPR तयार करण्यासाठी प्रोत्साहन व पाठपुरावा
३) DPR तयार करण्याच्या कामाच्या प्रगतीवर देखरेख
४) तयार DPR ची प्राथमिक छाननी
५) राज्यस्तरीय समितीने सादरीकरणामध्ये सूचविलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने DPR मध्ये सुधारणा झाल्या आहेत याची चाचणी तपासणी

**ब) स्वागतशील उपक्रम (Entry Point Activity) : EPA**
१) PPR च्या अनुषंगाने EPA ची कामे DPR तयार करण्यापूर्वी सुरु करण्यासाठी पाठपुरावा करणे.
२) EPA च्या अंमलबजावणीवर देखरेख : पंचायत राज संस्थांशी गरजेनुसार समन्वय,
३) EPA च्या अंमलबजावणीमधील अडचणी व उणीवा SLNA व शासन यांना कळविणे,

**क) क्षमता बांधणी (प्रशिक्षण) - Capacity Building :**
१) प्रशिक्षणामधील उपस्थिती,
२) प्रशिक्षणाचा दर्जा याबाबत छाननी तपासणी,
३) उणीवांबाबत यशदा व SLNA यांना कळविणे

**ड) नैसर्गिक संसाधनाचे व्यवस्थापन (Natural Resource Management : NRM)**
१) प्रत्यक्ष कामे करण्यासाठी पाठपुरावा.
२) गुणवत्तेबाबत देखरेख : निकषानुसार तपासणी,
३) पाणलोट समिती स्तरावर झालेल्या कामाच्या अदायगीबाबत : विलंब इ.संदर्भात समस्या निराकरण : SLNA व शासन यांना अडचणीबाबत माहिती देणे.

**इ) उपजिविका उपक्रम (Livelihood Activities)**
१) बचत गटाच्या सक्षमतेबाबत चाचणी तपासणी,
२) बचत गटाची प्रतवारी,
३) आपसामध्ये देवाण - घेवाण इ.,
४) अंमलबजावणी व देखरेख, बद्दल SLNA /शासनास Feed back

**फ) कृषी उत्पादन : सूक्ष्म उदयोजकता :- Agricultural Productivity System :- Microenterprises)**
जास्तीत जास्त Convergence बाबत प्रोत्साहन व आग्रह धरावा.